सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य उपकेंद्रातील आरोग्य सेविका पद भरतीकरिता पात्रता निकष गुणांची मर्यादा शिथील करण्याबाबत .....

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०२६ /प्र.क्र. १५५ /सेवा-२ (ई-१६९९४६९)**

गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार संकुल

नवीन मंत्रालय, मुंबई

दिनांक: ३० जुलै, २०२६

वाचा:-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का, १३-अ, दि. ०४ मे २०२२

२) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "नंदूरबार जिल्ह्यातील आरोग्य सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत" दि.०८जून, २०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य यंत्रणेत आरोग्य सेविका (ANM) हे पद अत्यंत महत्त्वाचे आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा मुख्य कणा मानले जाते. ग्रामीण आरोग्याचा मुख्य आधार असणाऱ्या आरोग्य सेविका थेट गावागावांत, वाड्या-वस्त्यांवर जाऊन आरोग्य सेवा पुरविण्याचे काम करतात. प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) आणि उपकेंद्र (Sub-centre) स्तरावर त्या कार्यरत असतात, ज्यावेळी डॉक्टर उपलब्ध नसतात, त्यावेळी आरोग्य सेविकाच पहिली वैद्यकीय मदत पुरवतात. माता आणि बाल संगोपनाच्या दृष्टीने गरोदर महिलांची नोंदणी करणे, त्यांची नियमित तपासणी करणे आणि त्यांना आवश्यक लोहयुक्त गोळ्या व लसीकरण देणे ही त्यांची जबाबदारी असते. नवजात बालकांपासून ते ५ वर्षांपर्यंतच्या मुलांचे संपूर्ण लसीकरण वेळेत पूर्ण करण्याची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर असते, ज्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मोठी मदत झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध आरोग्य योजना (उदा. जननी सुरक्षा योजना, मातृत्व वंदन योजना) तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम आरोग्य सेविका करतात. महाराष्ट्रातील विशेषतः दुर्गम आणि ग्रामीण भागातील आरोग्य दर्जा सुधारण्यात आरोग्य सेविकेचे योगदान अतुलनीय आहे. म्हणूनच त्यांची रिक्त पदे भरणे आणि पात्रता निकषांवर योग्य निर्णय घेणे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी अत्यंत गरजेचे आहे. राज्यातील ग्रामीण भागामध्ये आरोग्य व्यवस्थेमधील आरोग्य सेविकांचे महत्व व सद्यस्थितीतील त्यांची रिक्त पदे पाहता, भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील पदे सरळ सेवेने भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दि.०४ मे,२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनामधील मुद्दा क्रमांक ८ (२) मध्ये नमूद गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट -ड पदभरतीकरिता असणारी

४५% पात्रता गुणांची मर्यादा सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य सेविका (ANM) पदांच्या भरतीकरिता शिथील करून सदर पात्रता गुणांची मर्यादा ३५% टक्के करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील पदे सरळ सेवेने भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने दि. ०४ मे,२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनामधील मुद्दा क्रमांक ८ (२) मध्ये नमूद गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड पद भरतीकरीता असणारी ४५% पात्रता गुणांची मर्यादा सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य सेविका (ANM) पदांच्या भरतीकरिता शिथील करून सदर पात्रता गुणांची मर्यादा ३५% टक्के करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांच्या पदभरतीकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयामधील उर्वरित तरतुदी कायम राहतील.

२. सदर शासन निर्णय मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७३०१७३२३९५५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.07.30 18:56:32 +05'30'

(चंद्रकांत विभूते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई,
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद,
६. सर्व मा. विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य / प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय, मुंबई-३२,

९. सर्व विभागीय आयुक्त
१०.आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१३.संचालक, आरोग्य सेवा, पुणे/मुंबई
१४.महालेखापाल-१/२(लेखा परीक्षा) (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१५.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व मंडळे)
१८.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१९. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
२०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२१.अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. निवडनस्ती (सेवा-२),सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.